# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.07.2026** **वारःमंगळवार**

---

1. भारतीय वस्त्रोद्योगाला चालना देणाऱ्या टेक्स 2026 कार्यक्रमाचा आज दिल्लीत प्रारंभ.
2. श्रीराम जन्मभूमि मंदिराच्या देणग्यांच्या गैरवापराप्रकरणी, सर्वोच्च न्यायालयाची सरकार आणि श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टला नोटिस.
3. होर्मूझच्या सामुद्रधुनीत पुन्हा संघर्षाची परिस्थिती, अमेरिकेचे इराणवर सलग तीन हल्ले.
4. पश्चिम बंगालमध्ये बेपत्ता नौका उलटल्याचं स्पष्ट 9 मच्छिमारांचा मृत्यू, 6 जण अजूनही बेपत्ता. आणि
5. लॉर्डस मैदानावरील क्रिकेट कसोटीत भारतीय महिला संघाचा ऐतिहासिक विजय.

**भारत टेक्स**

देशातील वस्त्रोद्योगाला चालना देणाऱ्या, सर्वांत मोठ्या जागतिक भारत टेक्स 2026 या कार्यक्रमाला दिल्लीत आजपासून सुरुवात होत आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन होणार आहे. शेती ते धागा, कारखाना, फॅशन आणि परदेश या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या फाईव्ह एफ दृष्टीकोनावर हा कार्यक्रम आधारित आहे. वस्त्रोद्योग मूल्य साखळीतील व्यापार, गुंतवणूक, नावीन्य, धोरणात्मक चर्चा आणि धोरणात्मक भागीदारीसाठी हा कार्यक्रम प्रमुख व्यासपीठ होण्याचे उद्दीष्ट यामागे आहे.

**सर्वोच्चन्यायालय नोटीस**

श्रीराम जन्मभूमि मंदिराच्या उभारणीसाठी मिळालेल्या देणग्यांच्या कथित गैरवापराप्रकरणी, उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने सद्यस्थितीचा अहवाल सादर करावे असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने काल दिले. या अपहाराची सीबीआय म्हणजे गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना, न्यायालयानं केंद्र सरकार, उत्तर प्रदेश सरकार आणि श्री राम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्ट यांना नोटिस बजावली. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठानं याचिकांवर सुनावणी केली.

**अयोध्या कोठडी**

दरम्यान, श्रीराम मंदिर देणगीतील अनियमितता प्रकरणात अयोध्येतील एका न्यायालयानं काल सर्व आठ आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत 14 दिवसांनी वाढ केली.

**पियूष गोयल व्यापार**

भारत- अमेरिका यांच्यातील व्यापार चर्चेत अडथळा आल्याचं माध्यमांतील वृत्त वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी फेटाळून लावलं आहे. हे वृत्त खोटे, निराधार असून, दिशाभूल करणारे असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमांवरून दिलेल्या संदेशात त्यांनी, उभय देशांमध्ये संतुलित, व्यावसायिकदृष्ट्या अर्थपूर्ण व्यापार करार होण्यासाठी दोन्ही देश काम करत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**निर्यात वृद्धी**

एप्रिल ते जून 2026 या पहिल्या सहामाहीच्या कालावधीत भारताची एकंदर निर्यात 232 अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक असण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यामध्ये अकरा टक्क्यांहून थोडी अधिक सकारात्मक

वाढ दिसून आली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, जून महिन्यातील एकंदर निर्यात 73 अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी असण्याचा अंदाज आहे.

**नीट 2026 फेरपरीक्षा**

राष्ट्रीय परीक्षा परिषदेने नीट 2026 फेरपरीक्षेसाठी उमेदवारांच्या ओएमआर शीटस् आणि त्यांचे नोंदवलेले प्रतिसाद neet.nta.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. उमेदवार त्यांच्या अर्जाचा क्रमांक वापरून लॉगिन करू शकतात आणि उत्तरांची तुलनाही करू शकतात. पडताळणीनंतर तफावत आढळल्यास उमेदवार संबंधित प्रश्न आणि आपला दावा असलेलाय पर्याय निवडून विनापरतावा दोनशे रुपये प्रक्रिया शुल्क भरून आक्षेप नोंदवू शकतो. ही सुविधा उद्यापर्यंत 15 जुलैपर्यंत उपलब्ध आहे. उमेदवाराचा आक्षेप योग्य असल्यास शुल्क परत केले जाईल असंही एजन्सीनं कळवलं आहे.

**होर्मुझ सामुद्रधुनी**

इराण-अमेरिका यांच्यात पुन्हा एकदा संघर्ष तीव्र झाला आहे. अमेरिकेने सलग तिसऱ्या रात्री इराणवर हल्ले केले असून, त्यामुळे उभय देशांदरम्यानचा संघर्ष वाढला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी पिकॅक्स माउंटन नष्ट करण्याची धमकी दिली आहे. या ठिकाणी इराणकडून युरेनियम संवर्धन केंद्र विकसित केलं जात असल्याचा संशय पाश्चात्य गुप्तचर यंत्रणांना आहेत.

दरम्यान, होर्मूझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या इराणच्या जहाज वाहतुकीवर पुन्हा एकदा निर्बंध लागू केल्याची घोषणा अमेरिकेचे ट्रम्प यांनी केली आहे. त्याचबरोबर, सागरी सुरक्षेचा खर्च वसूल करण्यासाठी या मोक्याच्या मार्गावरून वाहातूक करणाऱ्या मालावर 20 टक्के शुल्क आकारले जाणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं आहे. हे निर्बंध केवळ इराणची जहाजे आणि इराणशी व्यापार करणाऱ्या जहाजांनाच लागू असतील असं त्यांनी म्हटलं आहे. त्याचवेळी अन्य देशांसाठी होर्मूझची सामुद्रधुनी खुली आहे, इतर देशांच्या व्यापारी जहाजांचा प्रवास विना अडथळा सुरू राहाण्याची ग्वाहीही ट्रम्प यांनी दिली आहे.

तर दुसरीकडे होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपलाच अधिकार असल्याचं इराणनं ठामपणे सांगितलं आहे. इराणच्या सरकारी प्रसार माध्यमांमधील वृत्तानुसार, सेंट्रल हेडक्वार्टर्सचे प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल इब्राहिम झोल्फघारी यांनी इराण कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेला होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या व्यवस्थापनात हस्तक्षेप करू देणार नसल्याचं म्हटलं आहे. तसंच अमेरिकेच्या सैन्याला कोणत्याही देशाने साहित्य आणि रसदीची मदत करणे म्हणजे इराणविरूद्ध युद्ध पुकारणे मानले जाईल असंही त्यांनी स्पष्ट केल्याचं माध्यमांच्या वृत्तात म्हटलं आहे.

**हल्ला**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जात असताना संयुक्त अरब अमिरातीच्या दोन टँकर्सवर इराणी क्रूझ क्षेपणास्त्रांनी हल्ला केला, यांमध्ये एका भारतीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून अन्य सहा जण जखमी झाले आहेत.

**इंधन दर**

होर्मूझच्या नाकेबंदीनंतर जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी वाढ झाली त्यामुळे होर्मूझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या इंधन पुरवठ्याविषयी चिंता निर्माण झाली आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीत 9 पूर्णांक 6 दशांश टक्क्यांनी वाढ झाली आहे.

**सुरक्षा परिषद सदस्य**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी भारतानं अधिकृतपणे आपली मोहीम सुरू केली. न्यूयॉर्कमध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी भारताच्या उमेदवारीची घोषणा केली. सध्या जागतिक संघर्ष आणि अस्थिरतेच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्राच्या भूमिकेचे महत्त्व वाढलं असून, जागतिक शांतता सुरक्षा आणि समन्यायी विकासाला चालना देण्यासाठी भारताचा शांती हा दृष्टीकोन मांडला. नियम, विश्वास आणि सचोटी या माध्यमांतून सर्वांगीण प्रगती साध्य करणे हे या दृष्टीकोनाचे ध्येय आहे.

**पश्चिम बंगाल नौका दुर्घटना**

पश्चिम बंगालमध्ये या महिन्याच्या सुरुवातीला किनारपट्टीवरून बेपत्ता झालेली मासेमारी नौका बंगालच्या उपसागरात उलटल्याचं स्पष्ट झालं आहे. या घटनेत बोटीवरील 9 मच्छिमारांचा मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं असून, सहा जण अजूनही बेपत्ता आहे. 15 मच्छिमारांसह शंकरपूर बंदरातून रवाना झालेल्या नौकेचा संपर्क 5 जुलैपासून तुटला होता. तटरक्षक दल, नौदल आणि राज्य यंत्रणांनी संयुक्त मोहिम राबवून ही नाव शोधली. मृतदेहांची डीएनए चाचणी करून ते नातेवाईकांना सोपवण्यात येतील अशी माहिती राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री राजेश महतो यांनी दिली. या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपये तर जखमींना 50 हजार रुपये मदत जाहीर केली आहे.

**अपघात**

महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील तीन महिला वारकऱ्यांचा काल रस्ते अपघातात मृत्यू झाला. पुण्याजवळ सासवड-जेजुरी मार्गावर, वारीतील भाविकांना, एका ट्रकनं धडक दिल्यामुळे  हा अपघात झाला. मृतांच्या वारसांना राज्य सरकारतर्फे प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

**व्हिएतनाम दुर्घटना**

व्हिएतनाममधील फू-क्वॉक बेटाजवळ, पर्यटकांच्या बोटीला झालेल्या अपघातात मृत पावलेल्या 15 भारतीय पर्यटकांचे मृतदेह काल भारतात आणण्यात आले. व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने समाजमध्यमांवरील संदेशांत ही माहिती दिली आहे.

**महिला क्रिकेट**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला क्रिकेट संघानं काल ऐतिहासिक कसोटी विजय नोंदवला. क्रिकेटची पंढरी मानली जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर या दौऱ्यातील एकमेव कसोटी सामन्यात भारतानं यजमान इंग्लंड संघाचा 270 धावांनी सहज पराभव केला.

पहिल्या डावातील 115 धावांच्या भक्कम आघाडीनंतर दुसऱ्या डावात भारतानं 7 बाद 341 धावांवर आपला डाव घोषित केला होता. 457 धावांचं लक्ष्य गाठताना, यजमान संघाचा दुसरा डाव काल चौथ्या दिवशी 186 धावांत आटोपला. भारताकडून स्नेह राणाने 4 बळी घेतले, तर सायली सतघरे, क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवले.
भारताची यष्टिरक्षक-फलंदाज यास्तिका भाटिया लॉर्ड्सवर कसोटी शतक झळकावणारी पहिली महिला ठरली. स्मृती मानधनानं पहिल्या डावात 83 तर दुसऱ्या डावात 70 धावा करून विजयात महत्वाचा वाट उचलला. पहिल्या डावात 5 आणि दुसऱ्या डावात 2 बळी घेणारी भारताची वेगवान गोलंदाज क्रांती गौड सामन्याची मानकरी ठरली.

दरम्यान, पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यातला मर्यादित षटकांचा पहिला सामना आज बरमिंगहम मध्ये होणार आहे.

**आसामपूर**

आसामध्ये अनेक जिल्ह्यातली पूरस्थिती कायम असल्यानं कामरूप आणि कामरूप जिल्ह्यामध्ये जनजीवन विस्कळीत झालं आहे. भारतीय हवामान विभागानं आज आणि उद्या विविध जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.